N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): परभणी P.S. (पोलीस ठाणे): मोधा Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0493 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 20/08/2026 00:15 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): बुधवार Date from (दिनांक पासून): 19/08/2026 Date To (दिनांक पर्यंत): 19/08/2026

Time Period (कालावधी): प्रहर ६ Time From (वेळेपासून): 15:39 तास Time To (वेळेपर्यंत): 16:00 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 20/08/2026 Time (वेळ): 00:05 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 001 Date and Time (दिनांक आणि वेळ): 20/08/2026 00:05 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 2 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): बालाजी भोजनालय, बसस्टण्ड जवळ, परभणी,परभणी

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): महेश मारुती पाटणकर

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1972

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , परभणी, नानलपेठ, परभणी, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, , परभणी, नानलपेठ, परभणी, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9870313157

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामेश्वर विलासराव काळे बीएलओ | | | 1. चिंचोली काळे ता जिंतूर,Town/Village (शहर / गाव): जिंतूर,Tehsil (तहसील): जिंतूर,Police Station (पोलीस ठाणे): बोरी,District (जिल्हा): परभणी,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 4 ना ेटा असे एकुण 2000/ रुपये | 2,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

सरकारतर्फे फिर्याद                दिनांक 19/08/2026

मी महेश मारुती पाटणकर वय 54 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी मोनं. 9870313157

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो कि, मी दिनांक 29/05/2025 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दिनांक 18/08/2026 रोजी 12::00 वाजता आम्ही लाप्रवि कार्यालय, परभणी येथे हजर असताना तक्रारदार श्री अब्दुल तौहीद अब्दुल सईद अन्सारी वय 34 वर्ष व्यवसाय-मजुरी रा. दर्गा रोड, रहिम नगर, परभणी हे हजर आले. त्यांची एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे सांगुन लेखी तक्रार सादर केली. सदर तक्रारीचा थोडक्यात सारांश असा कि, "माझे कुटूंबातील व्यक्ती ज्यात 1) अब्दुल सईद अन्सारी (वडील), 2) यासीन बेगम (आई), 3) अब्दुल जुनेद अन्सारी (भाउ), 4) अब्दुल माजीद अन्सारी (भाउ) व 5) अब्दुल जैद अन्सारी (भाउ) असे सर्व दर्गा रोड, रहिम नगर, परभणी येथे राहण्यास असुन त्यांचा प्रभाग क्रमांक 11 आहे.

दिनांक 13/07/2026 रोजी मी माझे कुटूंबातील व्यक्तींचे मतदान यादीत नाव टाकण्यासाठी बीएलओ काळे यांना एस.आय.आर. फाॅर्म भरुन दिला होता.

आज दिनांक 18/08/2026 रोजी बीएलओ काळे यांनी मला दुपारी 12::00 वाजता दर्गा रोड, अँझोन माॅल समोरील सय्यद होटलमध्ये फोन करुन बोलावुन घेतले. त्यावेळी बीएलओ काळे यांनी सांगितले कि, तुमच्या घरातील व्यक्तींचे नाव सन 2002 च्या मतदार यादीत नाही. तुमच्या घरातील व्यक्तींचे नाव मतदार यादीमध्ये टाकायचे असतील तर 2500/-रुपये लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करीत आहेत." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 18/08/2026 रोजी आम्ही सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी यांना पत्र देवुन 1) श्री. समाधान कचरुबा पवार, सहकार अधिकारी श्रेणी-2 व 2) श्री अजय संतराम टाक, कनिष्ठ लिपीक यांना शासकीय पंच म्हणुन ला.प्र.वि. कार्यालयास 14::30 वाजता गोपनीय कामात मदत करण्यासाठी पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांचा आपआपसात परिचय करुन दिला. सदर तक्रारीची खात्री करुन आम्ही व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर लाप्रवि, परभणी येथील कक्षात आमचे सुचनेवरुन पोशि/शाम बोधनकर यांनी दोन्ही पंच व तक्रारदार यांना डिव्हीआर बाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक हे परभणी शहरातील दर्गा रोड, येथील सरकारी दवाखाना येथील कार्यालयात भेटतील असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक काळे यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पवार यांना तक्रारदार यांचेकडे असलेल्या दुचाकी क्रमांक एम.एच. 22 बीएफ 7504 ने लोकसेवक काळे यांचेकडे पडताळणी करीता पाठविण्यात आले. सदरची पडताळणी कार्यवाही 16::12 ते 16::42 दरम्यान करण्यात आली. सदर पडताळणी दरम्यान तक्रारदार यांची लोकसेवक काळे यांचेशी भेट झाली नाही. त्यामुळे तक्रारदार यांचे विनंतीवरुन दिनांक 19/08/2026 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक 19/08/2026 रोजी 10::53 ते 11::27 दरम्यान तक्रारदार व पंच क्र 1 पवार यांना लोकसेवक काळे यांचे कार्यालयाकडे पाठवुन पडताळणी कार्यवाही करण्यात आली. सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक काळे यांनी तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा केली. परंतु लाचमागणी केली नाही. तक्रारदार हे लाप्रवि कार्यालयात हजर असताना लोकसेवक काळे यांचा तक्रारदार यांना

फोन कॉल आला. त्यावेळी लोकसेवक काळे यांनी तक्रारदार यांना भेटण्यास बोलाविले. सदर बाबतचे संभाषण फाईल क्र 1316 मध्ये रेकॉर्ड झाले आहे. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक काळे यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यामुळे पुन्हा 13:26 ते 14:41 दरम्यान पडताळणी कार्यवाही करण्यात आली. सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक काळे यांनी तक्रारदार अन्सारी यांना त्यांचे कुटूंबातील सदस्यांची नावे मतदार यादी समाविष्ट केले असे म्हणुन 2500/-रुपयाची लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांनी विनंती केल्याने काळे यांनी तुमच्या मनाने द्या असे म्हणाले. त्यामुळे तक्रारदार यांनी 500/-रुपये देतो असे म्हणाले. त्यावर लोकसेवक काळे यांनी तडजोडअंती 2000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा पुर्व कार्यवाही दरम्यान तक्रारदार कार्यालयात हजर असताना लोकसेवक काळे यांनी तक्रारदार यांना फोन करुन लवकर येण्यास सांगितले. सदर बाबतचे संभाषण फाईल क्र 1533 मध्ये रेकॉर्ड झाले आहे.

लोकसेवक काळे यांनी 2000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष 500/-रुपये दराच्या 04 नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर्स पंच क्र 2 टाक यांनी त्यांचे हस्ताक्षरात एका को-या कागदावर लिहले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अॅंथ्रासिन पावडर बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर सपोउपनि/निलपत्रेवार यांनी तक्रारदार यांनी जमा केलेल्या 500/-रुपये दराच्या 4 नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवल्या. त्यानंतर दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकास सापळा कार्यवाही अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. तसेच लोकसेवकाने लाचरक्कम स्विकारल्यास त्याबाबतचा पुर्व नियोजीत इशारा बाबत सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक कुठे भेटतील याबाबत विचारपुस केली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक काळे हे बसस्टॅण्ड जवळील हॉटेल दत्त येथे भेटतील असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते लोकसेवक काळे यांचेवर परभणी शहरातील बसस्टॅण्ड जवळील हॉटेल दत्त येथे सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र 1 पवार यांना तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल क्रमांक एम.एच. 22 बीएफ 7504 ने लोकसेवक काळे यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्यात आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 2 टाक, सापळा पथक असे मोटारसायकलने तक्रारदार यांचे पाठोपाठ गेलो. तक्रारदार यांनी मोटारसायकल बसस्टॅण्डजवळील हॉटेल दत्त समोर लावली. त्यानंतर तक्रारदार लगेच पंचासह मोटारसायकलने जवळ असलेल्या मेडीकल जवळ गेले. तेथे तक्रारदार यांना लोकसेवक काळे यांचा फोन आल्याने जवळच असलेल्या लोकसेवक काळे यांचेकडे गेले. लोकसेवक काळे हे तक्रारदार यांना घेवुन बालाजी भोजनालय येथे गेले. त्यांचे पाठोपाठ पंच क्र 1 हे तक्रारदार यांचेवर लक्ष ठेवत बालाजी भोजनालय समोर थांबले. त्यामुळे सापळा पथक बालाजी भोजनालयचे आजुबाजूस थांबले. काही वेळातच तक्रारदार यांनी बालाजी भोजनालयाचे बाहेर येवुन त्यांचेकडील डावे हाताने शर्टची उजवी बाही वर करुन लोकसेवकाने लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यामुळे आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक काळे यांना लाचरकमेसह ताब्यात घेतले. सदरची सापळा कार्यवाही हि 15:39 ते 16:00 वा दरम्यान करण्यात आली.

आज दिनांक 19/08/2026 रोजी 13:26 ते 14:41 वा करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही

दरम्यान लोकसेवक काळे यांनी तक्रारदार अब्दुल तौहीद अन्सारी यांना त्यांचे कुटूंबातील व्यक्तींचे नाव मतदार यादी मध्ये समाविष्ट केल्याचे सांगुन सुरुवातीस 2500/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तडजोडअंती 2000/-रुपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आज दिनांक 19/08/2026 रोजी 15::39 ते 16::00 वा दरम्यान बालाजी भोजनालय, बसस्टॅण्ड जवळ, परभणी येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक काळे यांनी तक्रारदार अब्दुल तौहीद अन्सारी यांचेकडुन त्यांचे कुटूंबातील सदस्यांचे नावे मतदार यादीत समाविष्ट केलेल्या कामाचे बक्षीस म्हणुन 2000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे.

म्हणुन माझी आरोपी लोकसेवक रामेश्वर विलासराव काळे वय 35 वर्ष व्यवसाय-नौकरी पद-सह शिक्षक, प्रेरणा विदयानिकेतन, प्राथमिक शाळा, परभणी सध्या नियुक्त परभणी मतदारसंघ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) रा. चिंचोली काळे ता. जिंतूर जि. परभणी यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VISHWAJEET GANGADHAR KASLE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

पोलीस ठाणे अंमलदार
नवा मोंढा पोलीस स्टेशन, परभणी

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): VISHWAJEET GANGADHAR KASLE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):